॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २९ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेतील एम.एस्सी.(प्रथम वर्ष) वर्गातील नियमित प्रवेशित व रिपीटर विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी दि. २८ मे रोजी `ओपन डे ` चे आयोजन करण्यात आले होते.

प्रशाळेत एप्रिल/मे, २०१९ मध्ये झालेल्या परीक्षांच्या तपासण्यात आलेल्या उत्तरपत्रिका, परिक्षार्थी विद्यार्थ्यांत्यांच्या थेट हातात देवून संबंधित विषयाचे परीक्षकांकडून त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. यावेळी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून झालेल्या चुकांमधून विद्यार्थ्यांनी बोध घेवून पुढील परीक्षांसाठी चांगली तयारी करावी, असे मार्गदर्शन केले. विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आपआपल्या मुळ उत्तरपत्रिकांचे पूर्णपणे अवलोकन केले व लिहिलेली मूळ उत्तरपत्रिका वाचतांना ती अधिक चांगली लिहिता आली असती याची जाणीव झाल्याचे विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना केले. यावेळी प्र-कुलगुरु पी.पी.माहुलीकर, प्रशाळेतील संचालक डी.एच.मोरे यांनीही मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रा.सौ.आर.एस.बेंद्रे, डॉ.डी.एस.दलाल, डॉ.व्ही.व्ही.गिते व श्री.ए.एम.पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रशाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

---

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : २९ मे, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी